नानाजी देशमुख कृषी संजीवनी प्रकल्प,

वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ , परभणी भारत मौसम विभाग

ईमेल - mahapocra@gmail.com, gkmsparbhani@yahoo.com

हिंगोली कृषि हवामान सल्ला **मंगळवार, दिनांक – १६.०६.२०२०**

हवामान घटक	हवामान अंदाज (दिनांक १७ जून २०२० ते २१ जून २०२०)				
दिनांक	१७/०६	१८/०६	१९/०६	२०/०६	२१/०६
पाऊस (मिमी)	२४.०	२८.०	०७.०	०५.०	१०.०
कमाल तापमान (अं.से.)	३४.०	३१.०	३३.०	३४.०	३६.०
किमान तापमान (अं.से.)	२४.०	२३.०	२३.०	२३.०	२४.०
ढग स्थिती (आकाश)	ढगाळ	ढगाळ	ढगाळ	ढगाळ	ढगाळ
सकाळची सापेक्ष आर्द्रता (%)	९२	९३	८९	८८	८८
दुपारची सापेक्ष आर्द्रता (%)	७६	८६	८०	६५	५९
वा-याचा वेग (किमी / तास)	१६	१७	१७	१३	१८
वा-याची दिशा	नैऋत्य	पश्चिम	नैऋत्य	पश्चिम	नैऋत्य

हवामानाचा इशारा	पुढील पाच दिवसात आकाश ढगाळ राहील. दिनांक १६ जुन २०२० रोजी मेघगर्जना व विजांच्या कडाक्यासह जोरदार पावसाची शक्यता आहे. इतर काळात तुरळक ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाच्या पावसाची शक्यता आहे. पेरणीयोग्य पाऊस (७५ मिमी पेक्षा जास्त) झाला असल्यास वापसा येताच जमिनीत पुरेसा ओलावा असल्याची खात्री करून बिजप्रक्रीया करूनच पिकांची पेरणी करावी.

पिकांचे नाव	अवस्था	कृषि हवामान सल्ला
कापूस	बिजप्रक्रीया	कापूस बियाण्यास थारयम किंवा कॅप्टन ३ ग्रॅम प्रती किलो बियाणे याप्रमाणात मिसळून बिजप्रक्रीया करावी. ॲझोटोबॅक्टर आणि स्फुरद विरघळविणारे जिवाणू प्रत्येकी २५० ग्रॅम प्रती १० किलो बियाण्यावर बिजप्रक्रीया करावी. बियाणे अर्धातास सावलीत सुकवून पेरणी करावी.
सोयाबीन	बिजप्रक्रीया	सोयाबीन बियाण्यास पेरणीपूर्वी कार्बोक्झिम (३७.५ %) + थायरम (३७.५ %) डीएस (मिश्र घटक) या बुरशीनाशकाची ३ ग्रॅम प्रती किलो बियाणे याप्रमाणात बिजप्रक्रीया करावी. तसेच ट्रायकोडर्मा (८–१०ग्रॅम / कि.ग्रॅ. बियाणे) चा सुध्दा यासाठी वापर करावा. या बुरशीनाशकांच्या बिजप्रक्रियेनंतर बियाण्यास रायझोबियम जिवाणू खत (ब्रेडी रायझोबियम) + स्फुरद विरघळविणारे जिवाणू खताची (पी.एस.बी.) २५० ग्रॅम प्रती १० किलो किंवा १०० मिली / १० किलो ग्रॅम (द्रवरूप असेल तर) याची बिजप्रक्रिया करावी. त्यानंतर बीयाणे सावलीमध्ये वाळवून शक्य तेवढया लवकर पेरणी करावी.
तुर	बिजप्रक्रीया	तुरीचे उत्पादन वाढविण्यासाठी तसेच जमिनीची उत्पादकता राखण्यासाठी तुर + बाजरी (१ : २ किंवा २ : ४), तुर + ज्वारी (३ : ३ किंवा २ : ४), तुर + कापूस (१ : ६ किंवा १ : ८) आणि तुर + सोयाबीन / मुग / उडीद (१ : २ किंवा २ : ४) असे ओळीचे प्रमाण ठेवून फायदेशीर आंतरपीक पध्दतीचा वापर केल्यास अधिक फायदा होतो.
खरीप ज्वारी	बिजप्रक्रीया	खरीप ज्वारी पिकाच्या पेरणीपूर्वी बियाण्यास गंधक ३०० मेश ४ ग्रॅम किंवा थायरम ७५ टक्के ३ ग्रॅम प्रती किलो बियाणे याप्रमाणात बिजप्रक्रीया करावी. ॲझोटोबॅक्टर व स्फुरद विरघळविणारे जिवाणू (पीएसबी) प्रत्येकी २५० ग्रॅम प्रती १० किलो बियाणे याप्रमाणात बियाण्यास चोळावे व अर्धा तास सावलीत सुकवावे.

बाजरी	बिजप्रक्रीया	बाजरी पिकाच्या पेरणीपूर्वी बियाण्यास मेटालॅक्झील ३५ % डब्ल्युएस ६ ग्रॅम प्रती किलो बियाणे यापमाणे बिजप्रक्रीया करावी. शेवटी ॲझोटोबॅक्टर व स्फुरद विरघळविणारे जिवाणू (पीएसबी) प्रत्येकी २५० ग्रॅम प्रती १० किलो बियाणे याप्रमाणात बियाण्यास चोळावे व बियाणे अर्धा तास सावलीत सुकवावे.
मुग / उडीद	बिजप्रक्रीया	मुग / उडदी पेरणीपूर्वी बियाण्यास प्रती किलो कार्बोक्झिम १ ग्रॅम किंवा थायरम २ ग्रॅम चोळावे तसेच ट्रायकोडर्मा ४ ग्रॅम प्रती किलो बियाण्यास बिजप्रक्रीया केल्यास बुरशीजन्य रोगापासून पिकाचे संरक्षण होते. त्याचबरोबर १० किलो बियाण्यास जिवाणूसंवर्धक रायझोबियम व पीएसबी प्रती २५० ग्रॅम लावून पेरणी करावी.
भुईमूग	बिजप्रक्रीया	भुईमूग पिकास थायरम ५ ग्रॅम अथवा कॅप्टन / कार्बेन्डॅझिम २.५ ते ३ ग्रॅम प्रती किलो बियाणे याप्रमाणात बिजप्रक्रीया करावी व ट्रायकोडर्मा १० ग्रॅम प्रती किलो बियाणे याप्रमाणात बिजप्रक्रीया करावी व रायझोबियम आणि स्फुरद विरघळविणारे जिवाणू (पीएसबी) प्रत्येकी २५० ग्रॅम बियाणे अर्धा तास सावलीत सुकवावे.
मका	बिजप्रक्रीया	मका पिकावरील लष्करी अळीच्या व्यवस्थापनासाठी बियाण्यास सायएन्ट्रीनिलीप्रोल १९.८० टक्के + थायोमिथॉक्झाम १९.८० टक्के ४ मिली प्रती किलो बियाण्यास बिजप्रक्रीया करावी. ॲझोटोबॅक्टर व स्फुरद विरघळविणारे जिवाणू (पीएसबी) प्रत्येकी २५० ग्रॅम व ट्रायकोड्रर्मा ५० ग्रॅम प्रती १० किलो बियाणे याप्रमाणात बियाण्यास बिजप्रक्रीया करावी व बियाणे अर्धा तास सावलीत सुकवावे.
पशुधन व्यवस्थापन	--	पशुधनास तज्ञ पशुवैदयकाकडून घटसर्प, फ-या रोग प्रतिबंधक लसी दयाव्यात.

सदर कृषि सल्ला पत्रिका डॉ पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, परभणी येथील ग्रामीण कृषि मौसम सेवा योजनेतील तज्ञ समितीच्या शिफारशीवरून तयार करून प्रसारित करण्यात आली असून नानाजी देखमुख कृषी संजीवनी प्रकल्प कार्यालय मुंबई येथून प्रसारित करण्यात आलेली आहे.